**सहायकांची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा सन २०१६ पासून दिनांक २९ डिसेंबर, २०१५ च्या सुधारणा नियमानुसार आयोजित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २३१५/प्र.क्र.२/का.१७**

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १६ जानेवारी, २०१६

**पहा-**

१) महाराष्ट्र शासनाच्या दुय्यम मंत्रालयीन सेवा ( सहायक ) सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, दिनांक ६ जून, १९७७.

२) महाराष्ट्र शासनाच्या दुय्यम मंत्रालयीन सेवा ( सहायक ) सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा (सुधारणा) नियम, दिनांक २६ नोव्हेंबर, १९८०.

३) महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालयीन सेवा ( सहायक ) सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा (सुधारणा ) नियम, २०१५, दिनांक २९ डिसेंबर, २०१५.

**प्रस्तावना -**

सहायक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७ हे दिनांक ६ जून, १९७७ रोजी अधिसूचित केले असून त्यामध्ये दि. २६ नोव्हेंबर, १९८० रोजी सुधारणा केली आहे. त्यातील नियम क्रमांक ११ नुसार परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण गुणांच्या ४० टक्के गुण मिळविणे आवश्यक होते. तसेच नियम क्रमांक १२ नुसार कोणत्याही परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवाराने कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविले असतील तर त्याला त्यानंतरच्या प्रयत्नामध्ये त्या प्रश्नपत्रिकेसाठी परीक्षेस पुन्हा बसण्यापासून आणि ती उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय होती.

२. वर नमूद सहायक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७ मधील नियम क्रमांक ११ आणि नियम क्रमांक १२ मध्ये आता दिनांक २९ डिसेंबर,२०१५ च्या अधिसूचनेव्दारे सुधारणा करण्यात आली असून, सदर अधिसूचना दि. ३१ डिसेंबर,२०१५ ते ६ जानेवारी, २०१६ या कालावधीच्या शासन राजपत्र भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार यापुढे आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षेत उमेदवारास प्रत्येक प्रश्नपत्रिकेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण आणि सूट मिळण्यासाठी किमान ५५ टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे.

३. वरील परिच्छेद १ व २ मधील वस्तूस्थिती विचारात घेता, मूळ नियमातील तरतूदीनुसार जे उमेदवार यापूर्वीच्या परीक्षेला अनुपस्थित राहीले होते, जे उमेदवार अनुत्तीर्ण झाले आहेत किंवा काही प्रश्नपत्रिकेत ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवून सूट मिळाली आहे अशा उमेदवारांनी यापुढे आयोजित होणाऱ्या परीक्षेत कोणती प्रश्नपत्रिका सोडविणे उचीत ठरेल ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

याबाबत शासन आता असे आदेश देत आहे की, उपरोल्लेखित परीक्षा सन २०१६ मध्ये आणि त्यापूढे दि. २९ डिसेंबर, २०१५ च्या सुधारणा नियमानुसार घेण्यात येईल. तसेच,

१) सदर परीक्षेसाठी प्रथमच बसणाऱ्या उमेदवारांनी सन २०१६ व त्यापुढील परीक्षा सुधारणा नियमानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. म्हणजेच त्यांना उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ५० टक्के गुण आणि सूट मिळण्यासाठी किमान ५५ टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.

२) मूळ परीक्षा नियमातील तरतूदीनुसार यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षेला जे उमेदवार कोणत्याही पेपरला अथवा सर्व पेपरला अनुपस्थित राहीले होते किंवा परीक्षेला बसून कोणत्याही पेपरमध्ये किंवा सर्व पेपरमध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत, अशा उमेदवारांनी सन २०१६ मध्ये व त्यानंतर आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षेत सुधारीत नियमानुसार त्या त्या पेपरमध्ये किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्यासाठी त्या-त्या पेपरमध्ये ५५ टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविणे आवश्यक राहील.

३) मूळ परीक्षा नियमातील तरतूदीनुसार यापूर्वी परीक्षेला बसून जे उमेदवार प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये उत्तीर्ण झाले आहेत त्यांना यापूढे सुधारीत नियमानुसार परीक्षा पुन्हा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नाही.

४) मूळ परीक्षा नियमातील तरतूदीनुसार यापूर्वीच्या परीक्षेत उमेदवारांना ज्या-ज्या प्रश्नपत्रिकेमध्ये ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळाल्यामुळे सूट देण्यात आली आहे, अशा सूट देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेची परीक्षा संबंधित उमेदवारांना सुधारीत नियमानुसार पुन्हा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१५४३३९४८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Dhananjay Tavarej

Digitally signed by Sanjay Dhananjay Tavarej
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3aa0457256d1492696e8751c12e2206cc354b97121be5c1e55042e70e6f7e4f7, cn=Sanjay Dhananjay Tavarej
Date: 2016.01.16 15:44:38 +05'30'

**( सं.ध.तवरेज )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव,
५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( विधानसभा ) मुंबई,

६. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( विधान परिषद ) मुंबई ,

७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ( पत्राने ),

८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,

९. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १४-अ, मंत्रालय, मुंबई,

१०. सर्व मंत्रालयीन विभाग ( आस्थापना ),

११. निवडनस्ती.